भारत सरकार
विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# शपथ अधिनियम, १९६९

## (१९६९ चा अधिनियम क्रमांक ४४)

[१ जुलै, १९८० रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Oaths Act, 1969

## (Act No. 44 of 1969)

[*As in force on the 1st July, 1980*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले
१९८१

[किंमत ५० पैसे]

# शपथ अधिनियम, १९६९

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. विवक्षित शपथा व दृढकथने यांची व्यावृत्ती.

३. शपथा देण्याची शक्ती.

४. साक्षीदार, दुभाषी आणि ज्यूरी-सदस्य यांनी शपथग्रहण किंवा दृढकथन करणे.

५. दृढकथन करू इच्छिणाऱ्या व्यक्तीने दृढकथन करणे.

६. शपथा किंवा दृढकथने यांचे नमुने.

७. शपथेचा अभाव किंवा नियमबाह्य गोष्ट यांमुळे कार्यवाही व साक्षीपुरावा विधिबाह्य न होणे.

८. साक्ष देणाऱ्या व्यक्ती सत्यकथन करण्यास बांधलेल्या.

९. निरसन व व्यावृत्ती.

एच ४३१७ (प्रसिद्धी दोन) (५३०—१-८१)

# शपथ अधिनियम, १९६९

## (१९६९ चा अधिनियम क्रमांक ४४)

[२६ डिसेंबर, १९६९]

**न्यायिक शपथांच्या संबंधातील कायदा एकत्रित करून विशोधित करण्यासाठी आणि अन्य विवक्षित प्रयोजनांसाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या विसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

संक्षिप्त नाव व विस्तार.

१. (१) या अधिनियमास, 'शपथ अधिनियम, १९६९' असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे.

विवक्षित शपथा व दृढकथने यांची व्यावृत्ती.

२. या अधिनियमातील कोणतीही गोष्ट लष्करी न्यायालयांसमोरील कार्यवाहीस किंवा संघराज्याच्या सशस्त्र सेनांच्या सदस्यांबाबत केंद्र शासनाने विहित केलेल्या शपथा, दृढकथने किंवा अधिकथने यांना लागू होणार नाही.

शपथा देण्याची शक्ती.

३. (१) पुढील न्यायालयांना व व्यक्तींना, कायद्याने त्यांना नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडताना किंवा त्यांना प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करताना, स्वतः किंवा कलम ६-पोटकलम (२) च्या उपबंधांच्या अधीनतेने त्यांनी याबाबतीत शक्ती प्रदान केलेल्या अधिकाऱ्याकरवी शपथग्रहण किंवा दृढकथन करवून घेण्याची शक्ती असेल, ती न्यायालये व त्या व्यक्ती अशा :—

(क्) सर्व न्यायालये व साक्षीपुरावा घेण्यास कायद्याने किंवा पक्षकारांच्या संमतीने प्राधिकार असणाऱ्या व्यक्ती;

(ख्) कोणत्याही भूसेनेच्या, नौसेनेच्या किंवा वायुसेनेच्या ठाण्याचा अथवा संघराज्याच्या सशस्त्र सेनेच्या ताब्यात असलेल्या जहाजाचा समादेशक अधिकारी—मात्र ते शपथग्रहण किंवा दृढकथन त्या ठाण्याच्या सीमांमध्ये करवलेले असले पाहिजे.

(२) पोटकलम (१) द्वारे किंवा त्या त्या काळी अंमलात असणाऱ्या अन्य कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याखाली प्रदान केलेल्या शक्तींना बाध न येता, प्रतिज्ञालेखांच्या प्रयोजनार्थ शपथग्रहण किंवा दृढकथन करण्याबाबत कोणत्याही न्यायालयाला, न्यायाधीशाला, दंडाधिकाऱ्याला किंवा व्यक्तीला,—

(क्) न्यायिक कार्यवाहीच्या प्रयोजनार्थ असलेल्या प्रतिज्ञालेखांच्या बाबतीत, उच्च न्यायालयाने; किंवा

(ख्) अन्य प्रतिज्ञालेखांच्या बाबतीत, राज्य शासनाने,

शक्ती प्रदान केलेली असल्यास त्यांना शपथग्रहण किंवा दृढकथन करवता येईल.

साक्षीदार, दुभाषी आणि ज्यूरी-सदस्य यांनी शपथग्रहण किंवा दृढकथन करणे.

४. (१) पुढील व्यक्ती शपथग्रहण किंवा दृढकथन करतील, त्या अशा :—

(क्) सर्व साक्षीदार, म्हणजे ज्या व्यक्तींची कोणत्याही न्यायालयाला अथवा अशा व्यक्तींची तपासणी करण्याचा किंवा साक्षीपुरावा घेण्याचा कायद्याने किंवा पक्षकारांच्या संमतीने प्राधिकार असणाऱ्या व्यक्तीला कायदेशीरपणे साक्ष तपासणी करता येईल किंवा ज्यांना त्यांच्यापुढे साक्ष देता येईल किंवा देण्यास भाग पाडता येईल त्या व्यक्ती;

(ख्) साक्षीदारांना विचारलेले प्रश्न व त्यांनी दिलेली साक्ष यांचे भाषांतर करून सांगणारा दुभाषी; आणि

(ग्) ज्यूरी-सदस्य :

परंतु जेव्हा साक्षीदार हा बारा वर्षांखालील वयाचे बालक असेल, आणि त्या साक्षीदाराला जरी खरे बोलण्याचे कर्तव्य समजत असले तरी त्याला शपथ किंवा दृढकथन यांचे स्वरूप समजत नाही असे न्यायालयाचे किंवा अशा साक्षीदाराची साक्ष तपासणी करण्याचा प्राधिकार असणाऱ्या व्यक्तीचे मत असेल तर, या कलमाचे पूर्वगामी उपबंध आणि कलम ५ चे उपबंध अशा साक्षीदाराला लागू होणार नाहीत. परंतु अशा कोणत्याही प्रकरणी शपथ किंवा दृढकथन यांच्या अभावी अशा साक्षीदाराने दिलेली कोणतीही साक्ष अस्वीकार्य ठरणार नाही, तसेच सत्यकथन करण्याच्या साक्षीदाराच्या आबंधनास त्यामुळे बाध येणार नाही.

(२) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे फौजदारी कार्यवाहीमध्ये, आरोपी व्यक्तीची बचावपक्षाचा साक्षीदार म्हणून साक्ष तपासणी करावयाची नसेल तर, तिच्याकडून शपथग्रहण किंवा दृढकथन करवणे कायदेशीर होणार नाही अथवा कोणत्याही न्यायालयाच्या अधिकृत दुभाष्याने आपली पदीय कामे पार पाडण्यास सुरुवात केल्यानंतर त्याच्याकडून, तो आपली कर्तव्ये इमानदारीने पार पाडील अशा तऱ्हेचे शपथग्रहण किंवा दृढकथन करवणे आवश्यक ठरणार नाही.

दृढकथन करू इच्छिणाऱ्या व्यक्तीने दृढकथन करणे.

५. एखाद्या साक्षीदाराला, दुभाष्याला किंवा ज्यूरी-सदस्याला शपथग्रहण करण्याऐवजी दृढकथन करता येईल.

शपथा किंवा दृढकथने यांचे नमुने.

६. (१) कलम ४ खाली करावयाची सर्व शपथग्रहणे किंवा दृढकथने ही, अनुसूचीमध्ये दिलेल्या नमुन्यांपैकी त्या त्या प्रकरणाच्या परिस्थितीमध्ये जो समुचित असेल अशा एखाद्या नमुन्यानुसार करवली जातील :

परंतु, कोणत्याही न्यायिक कार्यवाहीमध्ये एखाद्या साक्षीदाराची तो ज्या वर्गाचा आहे त्या वर्गाच्या व्यक्तींमध्ये सर्रास प्रचलित असणाऱ्या किंवा त्यांनी बंधनकारक मानलेल्या अशा आणि न्याय किंवा सभ्यता यांना प्रतिकूल नसलेल्या आणि कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीवर परिणाम करत असल्याचे न दिसणाऱ्या अशा कोणत्याही नमुन्यात शपथ घेऊन किंवा गांभीर्यपूर्वक दृढकथन करून साक्ष देण्याची इच्छा असेल तर, त्याला न्यायालय, स्वतःला योग्य वाटल्यास, यात यापूर्वी काहीही अंतर्भूत असले तरी, अशी शपथ घेऊन किंवा दृढकथन करून साक्ष देण्यास मुभा देऊ शकेल.

(२) सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालये यांहून अन्य सर्व न्यायालयांच्या बाबतीत, अशी सर्व शपथग्रहणे व दृढकथने ही त्या न्यायालयाचा खुद्द पीठासीन अधिकारी, अथवा न्यायाधीश किंवा दंडाधिकारी यांच्या न्यायपीठाच्या बाबतीत त्या न्यायाधीशांपैकी किंवा, प्रकरणपरत्वे, दंडाधिकाऱ्यांपैकी कोणीही करवील.

शपथेचा अभाव किंवा नियमबाह्य गोष्ट यांमुळे कार्यवाही व साक्षीपुरावा विधिबाह्य न होणे.

७. कोणतीही शपथ घेण्यास किंवा कोणतेही दृढकथन करण्यास चुकणे, त्या दोहोंपैकी एखाद्या कृतीऐवजी दुसऱ्या कृतीचा अवलंब करणे, आणि कोणतेही शपथग्रहण किंवा दृढकथन करवण्यामधील किंवा ते ज्या नमुन्यामध्ये करवले जाईल त्यामधील कोणतीही नियमबाह्य गोष्ट ज्यामध्ये किंवा ज्याच्या-बाबत घडली अशी कोणतीही कार्यवाही किंवा असा कोणताही साक्षीपुरावा हा अशी अकृती, बदली कृती किंवा नियमबाह्य गोष्ट यांमुळे विधिबाह्य ठरणार नाही किंवा सत्यकथन करण्याच्या साक्षीदाराच्या आबंधनाला त्यामुळे बाध येणार नाही.

साक्ष देणाऱ्या व्यक्ती सत्यकथन करण्यास बांधलेल्या.

८. कोणतेही न्यायालय अथवा शपथग्रहण किंवा दृढकथन करवण्यास याद्वारे प्राधिकृत केलेली व्यक्ती यांच्यापुढे कोणत्याही विषयावर साक्ष देणारी प्रत्येक व्यक्ती अशा विषयावर सत्यकथन करण्यास बांधलेली असेल.

निरसन व व्यावृत्ती.

९. (१) 'भारतीय शपथ अधिनियम, १८७३' (१८७३ चा १०) हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभी प्रलंबित असलेल्या कोणत्याही कार्यवाहीमध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ८ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा कोणत्याही शपथेस किंवा दृढकथनास बांधलेले राहण्याचे पक्षकारांनी कबूल केले असेल तर, उक्त अधिनियमाचे निरसन झाले असले तरीही त्याची कलमे ९ ते १२ यांचे उपबंध, जणू काही हा अधिनियम पारित झालेलाच नसावा त्याप्रमाणे अशा कबुलीला लागू असण्याचे चालू राहील.

# अनुसूची

(कलम ६ पहा)

## शपथा किंवा दृढकथने यांचे नमुने

नमुना क्र. १ (साक्षीदार) :—

मी, ईश्वराला स्मरून शपथ घेतो / गांभीर्यपूर्वक दृढकथन करतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपूर्ण खरे सांगेन आणि खऱ्याशिवाय काहीही सांगणार नाही.

नमुना क्र. २ (ज्यूरी-सदस्य) :—

मी, ईश्वराला स्मरून शपथ घेतो / गांभीर्यपूर्वक दृढकथन करतो की, मी यथायोग्य व यथार्थ संपरीक्षा करीन आणि राज्य व माझ्या स्वाधीन करण्यात येईल असा/असे न्यायासनासमोरील कैदी यांच्यामध्ये खरेखुरे अधिमत देईन आणि साक्षीपुराव्यानुसार खराखुरा अधिनिर्णय देईन.

नमुना क्र. ३ (दुभाषी) :—

मी, ईश्वराला स्मरून शपथ घेतो / गांभीर्यपूर्वक दृढकथन करतो की, साक्षीदारांना विचारलेल्या सर्व प्रश्नांचे व त्यांनी दिलेल्या साक्षीपुराव्याचे यथायोग्य व यथार्थ भाषांतर करून ते समजावून देईन आणि माझ्याकडे भाषांतरासाठी दिलेल्या सर्व दस्तऐवजांचे यथातथ्य व बिनचूक भाषांतर करीन.

नमुना क्र. ४ (प्रतिज्ञालेख) :—

मी, ईश्वराला स्मरून शपथ घेतो / गांभीर्यपूर्वक दृढकथन करतो की, हे माझे नाव आणि ही स्वाक्षरी (किंवा निशाणी) आहे आणि माझ्या या प्रतिज्ञालेखाचा तपशील खरा आहे.

## THE OATHS ACT, 1969

## शपथ अधिनियम, १९६९

### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| commanding officer | समादेशक अधिकारी | [ S. 3 (*1*) (*b*) ] |
| correctly and accurately | यथातथ्य व बिनचूक | [ Sch.—Form No. 3 ] |
| deliverance | अधिमत | [ Sch.—Form No. 2 ] |
| official interpreter | अधिकृत दुभाषी | [ S. 4 (*2*) ] |
| prisoner at the bar | आरोपीच्या पिंजऱ्यातील कैदी | [ Sch.—Form No. 2 ] |
| verdict | अधिनिर्णय | [ Sch.—Form No. 2 ] |
| well and truly | यथायोग्य व यथार्थ | [ Sch.—Form No. 3 ] |

———

# शपथ अधिनियम, १९६९

# THE OATHS ACT, 1969

## मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अधिकृत दुभाषी | official interpreter | .. [ S. 4 (*2*) ] |
| अधिनिर्णय | verdict | .. [ Sch.—Form No. 2 ] |
| अधिमत | deliverance | .. [ Sch.—Form No. 2 ] |
| आरोपीच्या पिंजऱ्यातील कैदी | prisoner at the bar | .. [ Sch.—Form No. 2 ] |
| यथातथ्य व बिनचूक | correctly and accurately | .. [ Sch—Form No. 3 ] |
| यथायोग्य व यथार्थ | well and truly | .. [ Sch.—Form No. 3 ] |
| समादेशक अधिकारी | commanding Officer | .. [ S. 3(*1*) (*b*) ] |

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई